# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई.

जुने प्रशासकीय महाविदयालय आवर, रूम नं.१,२,५ व ६ हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,मुंबई- ४०० ००१.

E-mail : mah-sforum@nic.in | दुरध्वनी क्र . २२०५७४०९ | दुरध्वनी क्र . २२०७२०९७

जा.क्र.राआ/लेखा /प्रिंटर खरेदी/ २०२४/ ८०९ दिनांक 02 FEB 2024

## दरपत्रक

### कार्यालयीन कामकाजासाठी प्रिंटर खरेदी करणेबाबत.

सुचना.

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र, मुंबई काळा घोडा कार्यालयासाठी प्रिंटर-४ व सी.एस. टी. कार्यालयासाठी प्रिंटर -१ अशा एकूण ५ प्रिंटरची आवश्यकता आहे.

कार्यालयासाठी आवश्यक असलेल्या प्रिंटरचा तपशिल खालीलप्रमाणे.

| तपशिल | | |
|---|---|---|
| १. | प्रिंटरची संख्या | ५ |
| २. | प्रिंटर specification | १)Leser Printer<br>२) A/४ Black and White multifunction Printer, Copy, Scan and Fax, ADF<br>३)Speed - २२ PPM<br>४) Mono<br>५) Composite Cartridge<br>६)Duplex<br>७) Warranty १ Year |

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कार्यालयीन कामकाजासाठी प्रिंटर खरेदी करावयाचे आहेत. त्याकरिता खालील विहित नमुन्यात इच्छित पुरवठादार यांच्याकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सदर कामकाजाचे अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) दरपत्रक सादर करण्याची पध्दत :- दरपत्रक एक लिफाफा पध्दतीने सादर करावा. दरपत्रक धारकाने लिफाफयामध्ये संबंधीत शासकीय विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र (उदा. शॉप एक्ट रजिस्ट्रेशन किंवा तत्सम रजिरूट्रेशन), वैध जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत पॅनकार्ड, आधार कार्ड स्वयाक्षांकित प्रत, कामाचा अनुभव असल्याच प्रमाणपत्र, वर्क ऑर्डर, विहित नमुन्यात दर GST सह नमूद करावेत तसेच स्वाक्षरी करून लिफाफा सीलबंद करावा.

२) लिफाफयावर दरपत्रक सादर करणा-या संस्थचे नाव, पत्त, ई-मेल व संपर्कासाठी दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.

३) दरपत्रक उघडल्यानंतर सर्वात कमी दर नमूद केलेले दरपत्रक स्वीकृत केले जाईल.

४) सशर्त दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

५) शासन नियमानुसार लाभार्थीच्या खात्यात रक्कम थेट जमा करणे अनिवार्य असल्याने अदाता नोंदणी झाली असल्यास अदाता नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करावी किंवा सोबत जोडलेला अदाता नोंदणी फॉर्म व रद्द केलेला मूळ धनादेश दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे.

६) काम पुर्ण झाल्यानंतर कर देयक (Tax Invoice) दोन प्रतीत मा. प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र मुंबई यांचे नावे देणे आवश्यक आहे. कर देयकावर GST नंबर नमूद असणे आवश्यक आहे. शासन नियमानुसार कोषागारातून देयक पारित झाल्यानंतर देयकाचे प्रदान करण्यात येईल.

७) दरामध्ये तसेच दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting पांढरी शाई लावणे टाळावे.

८) कोणतेही कारण न देता दरपत्रक कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचा अधिकार प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

९) पुरवठादारांनी दरपत्रक दि. ०९/०२/२०२४ रोजी संध्यकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा रितीने स्वतः उपस्थित राहून किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे.

१०) दि.०९/०२/२०२४ रोजी प्राप्त झालेले बंद लिफाफे दि.१२/०२/२०२४ रोजी दु. ३ ते ४ या वेळेत उघडण्यात येतील.

(रोहिणी सु. भोसले(नरसाळे))
प्र. प्रबंधक प्रशासन,
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र,मुंबई .

प्रत — राज्य आयोगाचे सी.एस.टी/काळा घोडा कार्यालय येथिल नोटीस बोर्डवर व आयोगाच्या grahak.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणे.